दाखल तारीख	११/०२/२०२५
नोंदणी तारीख	११/०२/२०२५
निर्णय तारीख	३०/०३/२०२६
कालावधी	०१ व., ०१ म., दि.१९.
CNR No.MHGA050000992025	

भाग – अ
(न्यायनिर्णयाची शीर्षक पान)
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (१)]

निशाणी क्र.०६ खाली...	
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज यांचे न्यायालयात. (पिठासीन अधिकारी – सतिश गो. गोरे)	
अपराध क्रमांकाचा तपशील	**अपराध क्र. ५०४/२०२३,** पोलीस स्टेशन, देसाईगंज.
न्यायनिर्णयाचा दिनांक	३०/०३/२०२६
प्रकरण क्रमांक	**संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक ५७/२०२५**
अभियोग पक्ष :	**महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस स्टेशन, अधिकारी, देसाईगंज, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.
अभियोग पक्षातर्फे	**श्री. आर.डब्ल्यु.सकिनलावार,** विशेष सहायक सरकारी अधिवक्ता
आरोपी :	**सुमन कुसन बालापुरे,** वय – ५० वर्ष, धंदा – घरकाम, रा. पिंपळगांव, ता. देसाईगंज, जि. गडचिरोली.
आरोपीतर्फे अधिवक्ता :	**कु. शेखानी.**

भाग – ब
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (२)]

घटनेचा दिनांक :	११/११/२०२३
एफ.आय.आर. दिनांक :	११/११/२०२३
दोषारोपपत्र दाखल दिनांक :	११/०२/२०२५
गुन्ह्याचा तपशील निश्चितीचा दिनांक :	११/०२/२०२५
पुराव्यास सुरुवात झाल्याचा दिनांक :	२२/०४/२०२५
निकालाकरिता ठेवल्याचा दिनांक :	१२/०३/२०२६
निकाल दिनांक :	३०/०३/२०२६
शिक्षा झाली असल्यास तो दिनांक	----

आरोपीचा तपशील

आ. क्र.	आरोपीचे नाव	अटकेची तारीख	जामिन तारीख	दोषारोप /आरोप	दोषी / निर्दोष	शिक्षा	तुरुंगामध्ये न्यायालयीन बंदी कालावधी
१.	सुमन कुसन बालापुरे	---	११/०२/२०२५	६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा	निर्दोष	नाही	नाही

भाग – क
[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४ (३)]
अभियोग पक्ष/ बचाव पक्ष / न्यायालयाने बोलाविलेल्या साक्षदारांची यादी

क्र.	नाव	साक्षदाराचे स्वरुप
अ.सा.क्र.१	हिरालाल शंकर प्रधान (**नि.क्र.०६ च्या पुढे**)	पंच साक्षदार
अ.सा.क्र.२	माधुरी गजानन राऊत (**नि.क्र.०६ च्या पुढे**)	पंच साक्षदार

बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

अ.क्र.	नाव	साक्षेचे स्वरुप
ब.सा.क्र. १	निरंक	निरंक

न्यायालयातर्फे नोंदविलेल्या साक्षदारांची यादी

अ. क्र.	नाव	साक्षेचे स्वरुप
न्या.सा.क्र. १	निरंक	निरंक

सरकार पक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

अ.क्र.	निशाणी क्रमांक	कागदपत्राचे स्वरुप
१	निरंक	निरंक

बचावपक्षातर्फे मान्य केलेल्या कागदपत्राची यादी

अ.क्र.	निशाणी क्रमांक	कागदपत्रांचे स्वरुप
१	निरंक	निरंक

बचावपक्षातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्रांची यादी

अ.क्र.	निशाणी क्रमांक	कागदपत्राचे स्वरुप
१	निरंक	निरंक

न्यायालयातर्फे निशाणी क्रमांक दिलेल्या कागदपत्राची यादी

अ.क्र.	निशाणी क्रमांक	कागदपत्राचे स्वरुप
१	निरंक	निरंक

मेटरीअल ऑब्जेक्ट/महत्त्वाच्या वस्तू

अ. क्र.	मटेरिअल ऑब्जेक्ट /महत्त्वाच्या वस्तू क्रमांक	वर्णन
१	निरंक	निरंक

:: न्यायनिर्णय ::

(जाहिर दिनांक ३०/०३/२०२६)

आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वये शिक्षेस पात्र अपराधाकरिता संपरिक्षा चालविण्यात आली. खटल्याच्या न्यायनिर्णयाकरिता पुढील मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील नमूद कारणांकरिता नोंदविण्यात येत आहे.

अ.क्र.	मुद्दे	निष्कर्ष
१.	अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. ११/११/२०२३ ला १०:४० ते ११.२० वाजताच्या सुमारास, मौजा पिंपळगांव, ता. देसाईगंज, जिल्हा गडचिरोली येथे आरोपी तिच्या घरामध्ये २० लिटर हातभट्टी मोहादारू अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता बाळगुन मिळून आली ?	**...नाही**
२.	आदेश काय ?	**...अंतीम आदेशानुसार**

कारणमिमांसा

मुद्दा क्र. १ करीता :–

२. आरोपीवर ठेवलेला दोषारोप सिद्ध करण्याकरिता अभियोग पक्षाने हिरालाल शंकर प्रधान **(अ.सा.क्र.१)** व माधुरी गजानन राऊत **(अ.सा.क्र.३)** यांना तपासले. अभियोग पक्षातर्फे पुरसीस **(नि.क्र.०८)** दाखल करून सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरूद्ध कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आला नसल्यामुळे तिचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१(१)(ब) अन्वयेचा जवाब वगळण्यात आला. रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे.

३. हिरालाल **(अ.सा.क्र.१)** व माधुरी **(अ.सा.क्र.२)** हे पंचनाम्यावरील पंच साक्षदार असुन त्यांच्या साक्षेत असे आले आहे की, आरोपी त्यांच्या गावची आहे. पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्यासाठी आरोपीच्या घरी बोलाविले होते. त्या ठिकाणी कॅनमध्ये दारू होती. त्याबाबतचा पंचनामा तयार करण्यात आला होता व त्यावर त्यांची सही घेतली होती. मोका

जप्ती पंचनामा **(नि.क्र. पी.१/पी.डब्ल्यु.१)** वर त्यांची सही असल्याचे त्यांनी सांगीतले. सा.क्र.२ ने उलटतपासात पंचनामा आधीच लिहुन ठेवला होता व त्यावर तिची सही घेतली होती, असे सांगीतले.

४. अभियोग पक्षाद्वारे तपासण्यात आलेल्या दोन्ही साक्षदारांनी जरी त्यांच्या समक्ष आरोपीच्या घरून कॅनमध्ये दारू पोलीसांनी जप्त केली होती व त्याबाबतचा मोका पंचनामा **(नि.क्र.पी१/पी.डब्ल्यु.१)** तयार केला होता, असे सांगीतले असले तरी पंचनामा तयार करणा–या इसमाची साक्ष नोंदविण्यात आलेली नाही. त्यामुळे कोणत्या दिवशी घटनास्थळ कम जप्ती पंचनामा तयार करण्यात आला होता, किती व कोणत्या प्रकारची दारू कोणाकडुन जप्त करण्यात आली होती, याबाबी स्पष्ट होत नाही. दोन्ही पंच साक्षदारांनी जरी आरोपीच्या घरी त्यांना पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते असे सांगीतले असले तरी जप्त केलेले द्रवण आरोपीच्याच घरून व आरोपीच्या मालकीचे किंवा अधिपत्याखाली असलेले होते ही बाब सिध्द होत नाही. प्रकरणामध्ये फिर्यादीची साक्ष न नोंदविल्यामुळे फिर्याद तसेच छापील प्रथम खबर अहवाल सिध्द झालेला नाही.

५. अभियोग पक्षाने रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर केलेला आहे, परंतु जप्त नमुने रासायनिक विश्लेषणाच्या कार्यालयात घेवून जाणारा कोणताही साक्षदार तपासलेला नाही. त्यामुळे नेमके कोणते जप्त नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविले होते, तसेच अभिलेखावर दाखल रासायनिक विश्लेषणाचा अहवाल हा नेमका कोणत्या प्रकरणातील जप्त

नमुन्यांचा आहे, हे स्पष्ट होत नाही. वर चर्चिलेल्या बाबी लक्षात घेता आरोपी बियर अवैधरित्या विनापरवाना विक्रीकरिता त्याच्या ताब्यात बाळगुन मिळून आला होता, ही बाब स्विकारार्ह नाही तसेच अभियोग पक्ष ती बाब सिद्ध करु शकला नाही.

६. कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा सिद्ध होण्यासाठी जप्त मुद्देमाल दारू आहे व ती दारु आरोपी विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बाळगून होती, या बाबी सिद्ध होणे आवश्यक आहे. तसेच, आरोपीकडून द्रावण जप्त करुन ते प्रथम मुद्देमाल मोहररकडे पोलीस स्टेशनमध्ये जमा केले आणि त्यानंतर मुद्देमाल मोहररपासून त्यामध्ये कोणतीही अदलाबदल किंवा अफरातफर न करता ते रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविले, याबाबत स्पष्ट असा साखळी पुरावा अभिलेखावर येणे आवश्यक असते.

७. वरील सर्व बाबींचा विचार केला असता असे दिसून येते की, अभियोग पक्ष आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

मुद्दा क्र. २ करीता :–

८. मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरुन आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. जप्त मुद्देमाल मोहा दारूपैकी रासायनिक विश्लेषणाकरिता काढलेल्या मुद्देमालाव्यतिरिक्त इतर मुद्देमाल नाशवंत असल्यामुळे जागेवरच नष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे त्याबाबत वेगळा आदेश करण्याची गरज नाही. म्हणून मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. आरोपीला भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जात मुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येते.

(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by SATISH GOPALRAO GORE
Date: 2026.03.30 14:58:10 +0530

दिनांक : ३०/०३/२०२६

(सतिश गोपालराव गोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, देसाईगंज.
JO CODE- MH02902